सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६९

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)**

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

एम डब्ल्यू आर आर ए/२०१७/प्रकरण क्र. ७ (२०१७)/२७४ दिनांक १५/५/२०२०

प्रकरण क्र. ७/२०१७

**अधिसुचित क्षेत्रात विहीर खोदण्यास परवानगी नाकारल्यामुळे निर्माण झालेल्या वादात श्री. सुभाष भगवंतराव घोटकर रा. मोर्शी, तहसिल मोर्शी, जिल्हा अमरावती यांनी दाखल केलेली याचिका.**

कृपया, उपरोक्त प्रकरणात म.ज.नि.प्रा. आदेश क्र. ०५/२०२० दिनांक १५/०५/२०२० ची प्रत यासोबत जोडली आहे.

स्वा.

सहपत्र वरीलप्रमाणे

(डॉ. रामनाथ सोनवणे)
सचिव, म.ज.नि.प्रा.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१) श्री. सुभाष भगवानराव घोटकर, तहसिल मोर्शी, जिल्हा अमरावती.
२) जिल्हा भू–जल प्राधिकारी व उपविभागीय अधिकारी, मोर्शी, जिल्हा अमरावती.
३) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू–जल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, अमरावती.
४) जिल्हाधिकारी, अमरावती.
५) विभागीय आयुक्त, अमरावती
६) संचालक, भू.स.वि.यं., पुणे

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६९

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)**

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra

Water Resources Regulatory Authority Act, 2005)

---

आदेश क्र. ०५/२०२०

**अधिसुचित क्षेत्रात विहीर खोदण्यास परवानगी नाकारल्यामुळे निर्माण झालेल्या वादात श्री. सुभाष भगवंतराव घोटकर रा. मोर्शी, तहसिल मोर्शी, जिल्हा अमरावती यांनी दाखल केलेली याचिका.**

**याचिका – प्रकरण क्र. ७/२०१७**

श्री. सुभाष भगवंतराव घोटकर

तहसिल, मोर्शी, जिल्हा–अमरावती

...........याचिकाकर्ता

विरूद्ध

१) जिल्हा भू–जल प्राधिकारी आणि उपविभागीय अधिकारी, मोर्शी, जिल्हा अमरावती

२) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू–जल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, अमरावती

३) जिल्हाधिकारी अमरावती

४) विभागीय आयुक्त, अमरावती

५) संचालक, भू.स.वि.यं. ........प्रतिवादी

**कोरम : श्री. विनोद तिवारी, मा. सदस्य (विधि आणि प्रभारी–जी डब्ल्यू),**

**श्री.व्ही.एम. कुळकर्णी, मा. सदस्य (ज.सं. अभियांत्रिकी),**

**डॉ. एस. टी. सांगळे, मा. सदस्य (ईकानॉमीक्स)**

**ता. १५ मे २०२०**

**पार्श्वभूमि :–**

याचिकाकर्त्याने मौजा कोपारा, तहसिल–मोर्शी, जिल्हा अमरावतीच्या गट क्र. ३०/२ए मध्ये सिंचनाकरीता नवीन खुली–विहीर खोदण्याची परवानगी करीता अर्ज दिनांक २२ डिसेंबर २०१४ मार्फत प्रतिवादी क्र. ३ बरोबर, आयुक्त कार्यालय अमरावतीच्या लोकशाही दिनामध्ये संपर्क साधला होता; परंतु १२ जानेवारी २०१७ रोजी लोकशाही दिनाच्या वेळी या प्रकरणांमधून हया बाबीवर निष्कर्ष निघू शकत नाही व अर्ज निकाली निघाला नाही कारण महाराष्ट्र भू–जल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम–१९९३ मधील तरतुदी प्रमाणे वर्ष २०१३ मध्ये जिल्हाधिकारी अमरावतीकडून अधिसूचित केल्या प्रमाणे सदर क्षेत्र अति समुपयोजित पाणलोट क्षेत्रात येत असल्यामुळे नवीन विहीरीकरीता परवानगी नाकारण्यात आली.

२. त्यानंतर याचिकाकर्तांने, सिंचना करीता, तीन वेगवेगळया स्थानांवर (ए) सर्व्हे क्र. ३०/२ ए मौजा कोपारा, तह. मोर्शी (बी) सर्व्हे क्र. १४/१ ए व (सी) सर्व्हे क्र. १४/१ मौजा अहमदपूर, तह. मोर्शी येथे तीन नवीन खुल्या विहीरी खोदण्याच्या परवानगीकरिता दि. २ मार्च २०१७ च्या अर्जान्वये प्रतिवादी क्र. १ ला अर्ज केला होता.

३. प्रतिवादी क्र. १ ज्याला महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम–२००९ च्या तरतुदी अंतर्गत जिल्हा भू–जल प्राधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. त्यांनी, प्रतिवादी क्र.२ यांचे पत्र क्र. २३३/२०१० दिनांक २९ जुलै २०१७ अन्वये दिलेल्या अभिप्रायाच्या आधारावर हा अर्ज खारीज केला. परवानगी

नाकारण्यासाठी जी कारणे दिली त्या प्रमाणे प्रस्तावित स्थाने लहान पाणलोट क्षेत्र (मिनी वॉटरशेड) ज.सं./३/॥ मध्ये समाविष्ट असून जे अति समुपयोजित क्षेत्र आहे व प्रतिवादी क्र. ३ यांनी त्यांचे आदेश दि. ११ फेब्रुवारी २०१३ अन्वये अधिसूचित क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. म्हणून, राज्य भू–जल प्राधिकारी यांनी महाराष्ट्र २००९ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून नवीन विहीर खोदण्यास बंदी घातली आहे.

४. राज्य भू–जल प्राधिकरणाने (एसजीडब्ल्यूए) दिनांक ३१ जुलै २०१५ ला महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या कलम ८ (१) अंतर्गत राज्यात ८० अति समुपयोजित व गंभीर पाणलोट क्षेत्र अधिसूचित केले आहे. एस.जी.डब्ल्यू.ए. चा सदर आदेश अधिसूचित क्षेत्रामध्ये सिंचन व औद्योगिक वापराकरिता ६० मि पेक्षा जास्त खोल सिंचन विहीरी खोदण्यास बंदी घातली आहे. दिनांक ३१ जुलै २०१५ ची ही अधिसूचना १९९३ चे अधिनियमाची तरतूदी अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचित क्षेत्रासंबंधी, २००९ चे नवीन अधिनियमाचे कलम ५९ च्या तरतूदी अंतर्गत, शिवाय पोटवाक्या प्रमाणे, अस्तित्वात असलेल्या अधिसूचनेवर आधारीत आहे.

५. प्रतिवादी क्र. १ च्या आदेशामुळे व्यथित झाल्यामुळे याचिकाकर्त्याने दिनांक १८ सप्टेंबर २०१७ रोजी या प्राधिकरणासमोर याचिका दाखल केली.

**याचिकाकर्त्याची विनंती**

अर्जदाराने त्याच्या अर्जान्वये पुढील विनंत्या केल्या आहेत.

१. तीन स्थानांवर (ए) सर्व्हे क्र. ३०/ए, कोपारा, तह. मोर्शी, (बी) सर्व्हे क्र. १४/१अ,(सी) सर्व्हे नं. १४, अहमदपूर तह. मोर्शी तीन विहीरींची परवानगी द्यावी.

२. शेत तळयाद्वारे विंधन विहीरी (१६० फुट) चे भू–जल पुनर्भरणाची परवानगी द्यावी.

## प्राधिकरणासमक्ष झालेली कार्यवाही

### अ. दिनांक २३ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या पहिल्या सुनावणीचा मतितार्थ

१) या सुनावणीस याचिकाकर्ता, प्रतिवादी क्र. १, २ व प्रतिवादी क्र. ५ चे प्रतिनिधी उपस्थित होते. याचिकाकत्याने अर्जात उल्लेख केलेल्या विनंत्या वाचून दाखवल्या. याचिकाकर्त्याने निदर्शनास आणून दिले की भू.स.वि.यं. ने वर्ष २०११–१२ च्या भू–जल माहिती (डाटा) वर आधारीत तांत्रिक अभिप्राय दिलेले आहेत. परंतु सध्याची वस्तूस्थिति अशी आहे की, उर्ध्व वर्धा सिंचन प्रकल्पाचे परतीचे पाणी (बॅक वॉटर) व मागील दोन वर्षात राज्यशासनाच्या जलयुक्त शिवार योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या विविध जल संधारण संरचनामुळे या क्षेत्रात विपूल प्रमाणात भू–जल आहे. या युक्तिवादासह याचिकाकर्त्याने पुर्नभरणाच्या परवानगी सह किमान एका विहीरीची परवानगी मंजूर करण्याची प्राधिकरणाला विनंती केली.

२) प्रतिवादी क्र. ५ चे प्रतिनिधी यांनी सांगितले की वर्ष २०१३–१४ करीता राज्याचे भू–जल मुल्यांकन जल संपत्ती मंत्रालय, नवी दिल्ली कडुन नुकतेच मंजुर झालेले आहे व या मुल्यांकना प्रमाणे प्राथमिक पाणलोट एलिमेंटरी वॉटर शेड क्षेत्र क्र. डब्ल्यू आर/२ हे अति समुपयोजित आहे. भू–जल उपसाची टक्केवारी १२३ टक्के आहे.

३) प्रतिवादी क्र.२ ने सादर केले की, कोपरा व अहमदपूर ही दोन गावे पाणी टंचाई ची गावे नाहीत व म्हणून शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेत समाविष्ट केलेली नाहीत. अपील कर्त्यांच्या जमीनीचे स्थान, उर्ध्व वर्धा सिंचन प्रकल्पाचे परतीचे पाण्याच्या (बॅकवॉटर) वर २० मीटर उंची वर आहे.

४) प्रतिवादी क्र. ५ चे प्रतिनिधी नी पुढे सादर केले की प्राथमिक पाणलोट क्षेत्र क्र. ज.सं./३/II पुर्नमुल्यांकनाचे काम ४ ते ५ महिन्याचे आत पुर्ण होईल.

५) सुनावणीच्या वेळी याचिकाकर्ता व प्रतिवादी कडून करण्यात आलेल्या विनंत्या विचारात घेऊन, याचिकाकर्त्याला दिलासा देण्यासाठी प्राधिकरणाने पुढील निर्देश देण्याचे ठरविले.

अ) प्रतिवादी क्र. २ ने याचिकाकर्त्याला अंतर्भूत करुन, अलिकडच्या माहितीच्या (डाटा) आधारावर, ज. सं./३/II चे लहान पाणलोट क्षेत्र निहाय, पुर्नमुल्यांकन मार्च २०१७ पर्यंत पूर्ण करावे व १५ एप्रिल २०१८ पर्यंत प्राधिकरणाला अहवाल सादर करतील.

ब) प्रतिवादी क्र. १ हे विचाराधीन क्षेत्र राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेत समावेशाची संभवता प्राधिकरणाला सादर करतील.

**बी) दि. १५ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या दुसऱ्या व अंतिम सुनावणीचा मतितार्थ.**

या सुनावणीस फक्त याचिकाकर्ता उपस्थित होते, प्रतिवादी क्र. १, २, ३, ४ व ५ अनुपस्थित होते.

याचिकाकर्त्याने सांगितले की, भू.स.वि.पं. ने मुल्यांकनाच्या प्रक्रियेमध्ये त्याचा समावेश केला नाही व ते पूर्ण झाल्यानंतर मूल्यांकन त्याला दाखविण्यात आलेले नाही. याचिकाकर्ता म्हणाला की, निरीक्षण विहीरीची संख्या ही कमी आहे व माहिती (डाटा) गोळा करण्याकरीता पुरेशी नाही. त्याने पुढे निदर्शनात आणून दिले की शेतकऱ्यांनी या भागात अनेक विहीरी खोदल्या आहेत व प्रतिवादी क्र. १ ने त्याची नोंदणी केलेली आहे. या आधारावर याचिकाकर्त्याने सिंचनाकरीता किमान एक विहीर खोदण्याची परवानगी मंजूर करण्याची या प्राधिकरणाला विनंती केली.

**सी) लेखी सबमिशनस चा मतिमार्थ**

१) सहाय्यक संचालक (भू–जल) कडून सादर केलेली टिपण्णी

१.१ जिल्हाधिकारी अमरावती यांनी त्यांचे आदेश क्र. २७/अ.का./पाट/का वि–८८/२०१३ दिनांक ११/२/२०१३ अन्वये महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याचे प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम १९९३ च्या कलम ६ अंतर्गत हे क्षेत्र अधिसूचित केले आहे व या क्षेत्रामध्ये नवीन विहीर बांधण्यास प्रतिबंध घातला आहे.

१.२ उपसंचालक भू.स.वि.पं. अमरावती विभाग व वरिष्ठ भूवैज्ञानिक भू.स.वि.प. अमरावती त्यांनी त्यांचे संयुक्त तांत्रिक अहवालात नमूद केले आहे की वर्ष २००८ च्या भूजल मूल्यांकना प्रमाणे (२०११

मध्ये पुर्नमुल्यांकन) कोपारा व अहमदपूर ही दोन गावे अति समुपयोजित लहान पाणलोट क्षेत्र (मिनी वॉटर रोड) क्र. ज.सं.३/II/II मध्ये समाविष्ट केलेली आहेत.

१.३ सदर क्षेत्र, महाराष्ट्र भू–जल (पिण्याच्या पाण्याचे प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम १९९३ च्या कलम अंतर्गत ज्याला महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या कलम ५९ (२) अंतर्गत वैधता आहे, जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेशान्वये अति–समुपयोजित म्हणून अधिसूचित केले असल्यामुळे जिल्हा प्राधिकारी/उपविभागीय अधिकारी मोर्शी यांनी त्यांचे आदेश क्र. राली–२/नवीन विहीर पर/कावि–२३/२०१७, दि. २९/७/२०१७ अन्वये याचिकाकर्त्याला नवीन विहीरीसाठी परवानगी नाकारली.

१.४ लहान पाणलोट क्षेत्र (मिनी वॉटर रोड) क्र. ज.सं.–३/II/II हे महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम, २००९ च्या कलम ४ (१) अंतर्गत अधिसूचित नाही. म्हणून, जिल्हाधिकारी अमरावती यांचे महाराष्ट्र भू–जल (पिण्याच्या पाण्याचे प्रयोजनासाठी विनियमन)अधिनियम, १९९३ च्या कलम ६ अंतर्गतचे आदेश महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनिय, २००९ च्या कलम १९ (२) अंतर्गत वैध आहेत.

२) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भू.स.वि.यं. अमरावती यांनी त्यांचे पत्र दि. ९ ऑक्टोबर २०१७ अन्वये सादर केले की :–

अ) संचालक भू.स.वि.यं. यांचे प. दिनांक २४ ऑगस्ट २०१७ अन्वये शिफारसी वरून, जिल्हाधिकारी अमरावती यांनी भू–जल (पिण्याच्या पाण्याचे प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम १९९३ च्या कलम ८ (२) अंतर्गत समुपयोजित व अति समुपयोजित पाणलोट क्षेत्र अधिसूचित केलेली आहे व अमरावती जिल्हयात ३७० गावांमध्ये नवीन विहीरी प्रतिबंधीत केल्या आहेत.

ब) याचिकाकर्त्याचे शेत अमरावती जिल्हयातील अहमदपूर येथील सर्व्हे क्र. १४/१ व १४/१/ए व कोपारा येथील सर्व्हे क्र. ३०/२ए हे ज.सं.–३ पाणलोट क्षेत्राच्या, जे अति समुपयोजित आहे, लहान पाणलोट क्षेत्र (मिनी वाटर रोड) II/II मध्ये येतात.

क) वर्ष २००४, २००७, २००८, २०११ व २०१३ मध्ये केलेल्या मुल्यांकनाप्रमाणे सदरचे ज.सं.–३ पाणलोट क्षेत्र हे अति समुपयोजित आहे.

ड) भू–जलाचे मुल्यांकन हे केंद्रीय भू–जल अंदाज समिती–१९९७ द्वारे ठरवून दिलेल्या कार्यपद्धती व मार्गदर्शक तत्वांना अनुसरून करण्यात आले आहे.

इ) मुल्यांकनामध्ये नल–दमयंती प्रकल्पाच्या परतीचे पाण्या (बॅक वॉटर) मुळे पुर्नभरण यथायोग्य विचारात घेतले असून ही वस्तूस्थिती याचिकाकर्त्यात कळविण्यात आली आहे.

फ) २०११ च्या मुल्यांकनाप्रमाणे प्राथमिक पाणलोट क्षेत्रा (एलिमेंटरी वॉटर रोड) चा भू–जल विकास १४७.९५ टक्के आहे; आणि म्हणून या पाणलोट क्षेत्रात नवीन विहीरी प्रतिबंधीत आहे. आणखी असे की, याचिकाकर्त्याने प्रस्तावित केलेली जागा व पिण्याच्या पाण्याची विहीर त्याच ज.सं.–३ (II/II) पाणलोट क्षेत्रात आहे.

जी) याचिकाकर्त्याने प्रस्तावित केलेल्या विहीरींची जागा अतिसमुपयोजित पाणलोट क्षेत्र ज.सं.(II/II) मध्ये असल्यामुळे (२०११ च्या भू–जल मुल्यांकनाप्रमाणे) उपविभागीय अधिकारी, मोर्शी यांनी महाराष्ट्र भू–जल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम–२००९ च्या कलम ८ (२) अंतर्गत त्यांचे पत्र दि. २९ जुलै २०१७ अन्वये नवीन विहीर खोदण्यात परवानगी नाकारली आहे.

३) अतिरिक्त संचालक, भू.स.वि.यं.पुणे यांनी पत्र दि. २० डिसेंबर २०१८ अन्वये सादर केले की :–

ए. अतिरिक्त संचालक, भू.स.वि.यं. यांनी त्यांचे पत्र दि. २० डिसेंबर २०१८ अन्वये सादर केले आहे की वर्ष २०१३–१४ भू–जलाचे मुल्यांकन भूजल अंदाज समिती–१९९७ यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वे व कार्यपद्धतींना अनुसरून करण्यात आले आहे. भू.स.वि.यं. ने या

मार्गदर्शक सुचनांशी बरोबर मिळते–जुळते सॉफ्टवेअर विकसित केलेले आहे. या सॉफ्टवेअर मध्ये सर्व संबंधीत माहिती जसे पर्जन्यवृष्टी, भू–जल पातळी, सिंचन विहिरींची संख्या, पिकपद्धती, सिंचन प्रकल्प व कालवा सिंचन, भरण्यात येते.

या सॉफ्टवेअर पासून मिळालेले परिणाम असे दर्शवते की लहान पाणलोट क्षेत्र (मिनी वॉटर शेड) ज.सं.–३ (II/II) मधील भू–जलाचा विकास अजूनही १०० टक्के पेक्षा जास्त आहे व त्याच्या अति समुपयोजित पाणलोट क्षेत्राच्या विद्यमान स्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

## मुद्दे साचेबद्ध करणे

या याचिकेच्या संपूर्ण अभिलेखांची तसेच कायदेशीर भूमिकेवर आधारित तथ्य आणि परिस्थितिची तपासणी केल्या नंतर प्राधिकरण या मताचे आहे की, हा वाद जो प्रामुख्याने प्रतिवादीने आक्षपित आदेश पारित करतांना योग्य कायदेशीर स्थिति विचारात न घेतल्यामुळे निर्माण झालेला आहे, तो पुढील महत्वाचे मुद्दे विचारात घेवून सोडवता येऊ शकतो. म्हणून अधिक चांगल्या अभिनिर्णयाकरीता पुढील मुद्यांची संरचना करणे सुज्ञपणाचे असल्याचे प्राधिकरणाला आढळले.

१. प्रतिवादी क्र. १ ने पारीत केलेले आदेश महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या तरतुदी प्रमाणे वैध आहेत काय? जर नसतील तर ते आदेश रद्द करून बाजूला सारावे काय?

२. वास्तविक व कायदेशीर स्थितित या प्रकरणात काही योग्य सवलत किंवा आदेश पारित करण्याची आवश्यकता आहे काय ?

## प्राधिकरणाचे निष्कर्ष

१) प्रतिवादी क्र. १ ने पारित केलेले आदेश महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या तरतुदीप्रमाणे वैध आहेत काय ? जर नसतील तर ते आदेश रद्द करून बाजूला सारावेत काय?

१. ही वस्तु स्थिति आहे की महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ हे ०१ जुन २०१४ पासून अंमलात आलेले आहेत. म्हणजे, जेव्हा प्रतिवादी ने हे आदेश प्रारित केले, तेव्हा महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या तरतुदी लागू होत्या व जुन्या कायद्याच्या म्हणजे महाराष्ट्र भू–जल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम–१९९३. तरतुदी लागू होत नव्हत्या. परंतु प्रतिवादी क्र. १ हा आदेश पारित करतांना ही कायदेशीर स्थिति समजू शकला नाही.

२. प्रतिवादी क्र. १ ने जुन्या अधिनियमाच्या तरतुदींचा उपयोग करून पारित केलेले आदेश वैध व कायदेशीर नाही. म्हणून प्रतिवादीने क्र. १ ने अधिसूचित क्षेत्रात महाराष्ट्र भू–जल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम १९९३ च्या कलम ६ च्या तरतूदीनुसार सिंचन उपयोगाकरीता नवीन विहीर खोदण्याची परवानगी नाकारणे कायदयाच्या दृष्टितून चुकीचे आहे. वस्तूस्थिति प्रमाणे सदर जुने अधिनियम यापूर्वीच ०१ जुन २०१४ पासून महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या कलम ५९ अंतर्गत रद्दबादल झाले आहेत. खरं तर प्रतिवादी क्र. १ ने अर्जदाराच्या अर्जाची दखल घेण्याची आवश्यकता नव्हती कारण असे विहीर खोदण्याची परवानगी मंजूर करण्याकरिता च्या अर्जाची दखल घेणे व निर्णय घेण्याचे अधिकार त्याला नाहीत.

३. महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या कलम ३२ च्या तरतूदी प्रमाणे, अधिसूचित क्षेत्रामध्ये सिंचन उपयोगाकरिता नवीन विहीर खोदण्याची परवानगी मंजूरी किंवा नाकरण्यास पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती (डब्ल्यु डब्ल्यू आर सी) सक्षम प्राधिकारी आहे.

४. प्रतिवादी क्र. १ कडून पारित करण्यात आलेले आदेश वैध नाही आणि म्हणून खारीज करून बाजूला सारणे आवश्यक आहे.

**अशा प्रकारे या मुद्दाचे उत्तर होकारार्थी आहे.**

२) वास्तविक व कायदेशीर स्थितित या प्रकरणात काही योग्य सवलत किंवा आदेश पारित करण्याची आवश्यक आहे का ?

१. तथ्य आणि परिस्थिति विचारात घेऊन २००९ चे नवीन अधिनियमाची तरतुदी प्रमाणे खोल विहीर खोदण्याची परवानगीचे मंजूरी करीता अर्जाची दाखल घेणे व निर्णय घेण्यात सक्षम प्राधिकार पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती (डब्ल्यू डब्ल्यू आर सी) यांना आहेत.

२. अर्जदार ज्या क्षेत्रात विहीर खोदू इच्छितो, ते क्षेत्र, विद्यमान वैध अधिसूचने प्रमाणे अधिसूचित क्षेत्रात येत असल्यामुळे अर्जदारास अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अशा परवानगी करीता डब्ल्यू डब्ल्यू आर सी कडे संपर्क साधणे आवश्यक आहे.

३. सदर अधिसूचित क्षेत्राकरिता, अद्याप पर्यंत डब्ल्यू डब्ल्यू आर सी ची निर्मिती पूर्ण झाली नाही आणि म्हणून, या प्राधिकरणाच्या सचिवांना प्रतिवादी क्र. ५ बरोबर सल्लामसलत करून अधिसूचित क्षेत्राच्या संबंधात डब्ल्यू डब्ल्यू आर सी च्या निर्मिती ची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता आहे जेणे करून अर्जदार अशा परवानगीकरीता डब्ल्यू डब्ल्यू आर सी कडे संपर्क साधू शकेल.

**अशा प्रकारे वर दिल्याप्रमाणे या मुद्दाचे उत्तर होकारार्थी येते.**

## निर्देश

दाव्यातील पक्षकारांना ऐकून घेतल्या नंतर व अभिलेखावरील दस्तऐवजांना, पक्षकारांकडून केलेल्या सादरीकरणाला योग्य प्रकारे विचारात घेउन व तयार केलेल्या मुद्यांवर निर्णय घेतल्या नंतर, हे प्राधिकरण या द्वारे खालील प्रमाणे निर्देश देते. –

१. प्रतिवादी क्र. १ चे दिनांक २९ जुलै २०१७ चे आदेश महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या तरतुदी नुसार नाहीत आणि म्हणून वैध व कायदेशीर नसल्यामुळे ते खारीज करून बाजूला सारण्यात येतात.

२. या प्राधिकरणाचे सचिव यांना त्यांनी प्रतिवादी क्र. ५ बरोबर सल्लामसलत करून अमरावती जिल्हयातील या अधिसूचित क्षेत्र संदर्भात पाणलोट क्षेत्र जल संपत्ती समिती (डब्ल्यू डब्ल्यू आर सी) च्या निर्मितीची प्रक्रिया या आदेशाच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत.

३. डब्ल्यू डब्ल्यू आर सी निर्मिती व अधिसूचित झाली की अर्जदार, महाराष्ट्र भू–जल (वि आणि व्य) अधिनियम २००९ च्या कलम २२ अंतर्गत तरतुदीप्रमाणे सदर अधिसूचित क्षेत्रात सिंचन उपयोगाकरीता नवीन विहीर खोदण्याची परवानगी घेण्यासाठी, अर्ज सादर करण्यासाठी स्वतंत्र राहील. याचिका त्यानुसार खर्चाविना, निकाली काढण्यात येत आहे.

स्वा/–
(डॉ. एस. टी. सांगळे)
सदस्य (ईकॉनॉमीक्स)

स्वा/–
(व्ही. एम. कुळकर्णी)
सदस्य (ज.सं.अभियांत्रिकी)

स्वा/–
(विनोद जे. तिवारी)
सदस्य (कायदा व प्रभारी जी.डब्ल्यु)

स्वा/–
(डॉ. रामनाथ सोनवने)
सचिव